# माहे मार्च २०२२ महाचा मासिक अहवाल

## मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | सांगली | कुपर (डॉबरमन) | १) मपोशी/३७३ एस.एस.आतार<br>२) रिक्त | सांगली ग्रामीण पो.स्टे. गु.र.नं. ३०/२०२२ भा.द.वि. कलम ३०२, ३०७, ३४ हा गुन्हा दि. २२/३/२०२२ रोजी ०३:१७ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील संशयीत ७ इसमांना ओळखपरेड कामी एका रांगेत उभे केले व घटनास्थळावरील संशयीत आरोपीने वापरलेल्या लोखंडी रॉडचा वास श्वान कुपर यास देवुन सोडले असता. श्वान संशयीत इसमांचा वास घेत घेत पुढे जावून संशयीत आरोपी नामे प्रथमेश सुभाष साळुंखे याचेजवळ वास घेवुन थांबला. त्या आधारे सदर संशयीत आरोपीला अटक केल्यानंतर गुन्हा उघडकीस आला आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | सिंधुदूर्ग | रॅम्बो | १) पोना/१०५४ एस.एस.देवळेकर<br>२) पोना/४४५ ए.जी.वेंगुर्लेकर | देवगड पो.स्टे. गु.र.नं. ३२/२०२२ भा.द.वि. कलम ३८०, ४५४, ४५७ हा गुन्हा दि.२९/३/२०२२ रोजी २२:३० वा. दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावरील संशयीत आरोपीने हाताळलेल्या लाकडी ड्रॉव्हरच्या दरवाजाचा वास श्वान रॅम्बो यास दिला असता श्वान रॅम्बो बेकरीमधून बाहेर पडून डावीकडे वळून सरळ पुढे १ कि.मी. अंतर जावून एका इमारतीजवळ जावून थांबला. श्वानाने दाखविलेल्या मार्गावरून पुढे तपास केला असता आरोपी आकाश मुकुंद कोयंडे यास अटक केल्यानंतर गुन्हा उघडकीस आला आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | जालना | लीली डॉबरमन | १) पोहवा/१३०६ एस.पी.गोणेलवार<br>२) पोना/१९९ एस.डी.गायकवाड | शेवली पो.स्टे. गु.र.नं. ५३/२०२२ भा.द.वि. कलम ३०२, १२० (ब), १४३, १४७, १४८, १४९, हा गुन्हा दि.२३/३/२०२२ रोजी १५:४७ वाजता दाखल असून सदर गुन्हयातील घटनास्थळावरील मयत इसमाचे बाजूला पडलेल्या कापडी उशीचा वास श्वान लीली हीस दिला असता ती वास घेत घेत बाजूस असलेल्या घरात जावुन परत घटनास्थळापर्यंत आली. सदर घराची चौकशी केली असता सदर घरात राहणारा संशयीत आरोपी अजसिंग नाथसिंग उर्फ सर्जेराव राठोड हा फरार असल्याचे समजले सदर गुन्हयाच्या पुढील तपासात विदया लक्ष्मण राठोड हीस अटक केले असता गुन्हा उघडकीस आला. |



अशा प्रकारे माहे मार्च २०२२ मध्ये खून - २, घरफोडी - १ असे एकुण ३ गुन्हे श्वान पथक / बीडीडीएस पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.